


Scanned by CamScanner

*peer Reviewed*

RNI. MAHMUL 03374/2015-TC

ISSN 2454 - 8332

*International*

*Interdisciplinary Multilingual Research Journal*

# IMPACT FACTS

**Quarterly - vol.2 * Issue - 1 * 15 Sept. - 14 Dec. 2016 * Rs. 100/-**

**Editor** :- Kailas Ganpatrao Kaninde

**Co-Editor** :- Dr.Sidharth Jadhav

:- Asst.Prof. Rahul Pandit

**• Associate Editor •**

Dr. Dongre L.B.
Dr.Kuchekar H.S.
Dr. Bhosale B.R.
Dr.Shere P.L.
Dr.Vijapure B.V.
Asst.Prof.Koreboinwad V.D.
Dr.Rathod Bharat
Principal Navse D.G
Asst.Prof.Bansode S.R.
Asst.Prof.Raje S.V.
Asst.Prof. Dongre N.B.
Asst.Prof. Bansode S.S.
Asst.Prof.Kamble N.R.
Asst.Prof.Adsare V.B.

* This Quarterly Peer Reviewed Research Journal"Impact facts"contains the different opinions of authors and researchers. Its printer, owner, publisher, editor board of this journal not responsible. For any controversial remarks or opinions of researchers.

* Any copy right issues like plagrism, found in any paper, here auther and research will be responsible for that but not printer, owner, publisher and editor of this impact facts.

"**Impact Facts**" a quarterly Journal has been printed by Manohar Digambar Jondhale , Rohini Printing Press, Vaishali Nagar, Plot No.19, Taroda (Buzurg), Nanded 431605. For its owner, publisher and editor Mr.Kailas Ganpatrao Kaninde and Published at Near the Buddha Vihar, in front of Nagsen Public reading room, Samtanagar, Bhokar, Tq.Bhokar Dist.Nanded - 431801

Scanned by CamScanner

# INDEX


| SR. NO. | PAPER TITLE | AUTHOR NAME | PAGE NO. |
|---|---|---|---|
| 01 | An analytical study of Dalit Vasti SudharYojna in Junnar Municipal council | Rahul Pandit | 01 |
| 02 | Physico-Chemical Characteristics of Penganga River of Tribal area of Kinwat Dist. Nanded, Maharashtra | Dr.A.P. Bhalerao | 04 |
| 03 | Role of Information and Communication Technologies in Human Development Rights – Digital Divide | Mr.Kailas Kaninde | 10 |
| 04 | Role of Commerce Education In The Changing Business World | Dr.Sidharth S.Jadhav | 13 |
| 05 | Toni Morrison's Beloved"- Sethe Connects with all "she" Characters | Shalaka Vijay Kadam | 16 |
| 06 | डॉ.सुशीला टाकभोरे कृत निबंध संग्रह 'परिवर्तन जरूरी है' में चित्रित दलित साहित्य | पाटील सुखदेव रामा | 21 |
| 07 | कोल्हापूर जिल्ह्यातील छत्रपती शाहू महाराजांच्या काळातील दलित कार्यकर्ते व दलितांची चळवळ : एक समाजशास्त्रीय अभ्यास | प्रा. बनसोडे एस. एस. | 23 |
| 08 | ॲट्रॉसिटी कायदा प्रभाविपणे कार्यरत ठेवणे आंबेडकरवाद्यांपुढील एक नविन आव्हान | भैय्यासाहेब तुकाराम गोडबोले | 30 |
| 09 | मानवी हक्क आणि महिलांची सद्यस्थिती : एक समाजशास्त्रीय अभ्यास | शेळके सुदर्शन किशनराव<br>कानिंदे कैलास गणपतराव | 35 |
| 10 | भारतीय निवडणूक आयोगाची प्रासंगिकता | डॉ. पंजाब चव्हाण<br>नामदेव बाबुराव डोंगरे | 38 |
| 11 | नकारात्मक मतदानाचा पर्याय (NOTA) : एक दृष्टिक्षेप | प्रा. डॉ. कुचेकर एच्. एस. | 41 |
| 12 | अध्यापन आणि साहित्य : एक अनुबंध | जगताप बालासाहेब नारायणराव | 46 |
| 13 | स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निर्वाचन प्रक्रियेत ७३ व्या व ७४ व्या घटना दुरुस्तीने झालेले बदल | डॉ. पंजाब चव्हाण,<br>नामदेव बाबुराव डोंगरे | 50 |
| 14 | भारतामध्ये रंगातून ही पाळला जातो जातीद्वेष | भैय्यासाहेब तुकाराम गोडबोले | 53 |
| 15 | मध्यवर्ती बँक व वित्तीय सुधारणा | प्रा. सचिन नागोराव कसबे | 57 |
| 16 | इंद्रजित भालेराव यांची ग्रामीण कविता | जाधव प्रल्हाद परसराम | 59 |


Scanned by CamScanner

# मध्यवर्ती बँक व वित्तीय सुधारणा

प्रा. सचिन नागोराव करवे
सहाय्यक प्राध्यापक
अर्थशास्त्र विभाग,
श्री शिव छत्रपती महाविद्यालय, जुन्नर

**प्रस्तावना :–**

मध्यवर्ती बँक ही विसाव्या शतकात निर्माण होणारी एक महत्वपूर्ण अग्रणी अशी बँकिंग क्षेत्रातील संस्था आहे. जगातील बहुतांश केंद्रीय बँका विसाव्या शतकात स्थापन झालेल्या आहेत. 1694 मध्ये बँक ऑफ इंग्लंड स्थापना झाली. याच धर्तीवर बहुतांश बँका स्थापन झालेल्या आहेत. मध्यवर्ती बँकेकडे चलननिर्मितीची मक्तेदारी आहे. देशाच्या विकासाची जबाबदारी मध्यवर्ती बँकेकडे असते. चलन व पतचलन सूरक्षित ठेवून विकासाला मदत करण्याचे कार्य मध्यवर्ती बँक किंवा केंद्रीय बँक करते. देशातील बँकांची बँक, सरकारची बँक म्हणून मध्यवर्ती बँक कार्य करते.

सरकारची बँक म्हणून कार्य करीत असताना सरकारच्या सर्व बँकिंगविषयक गरजा पूर्ण करण्याची जबाबदारी मध्यवर्ती बँकेवर असते. व्यापारी बँका ज्याप्रमाणे सर्वसामान्य ग्राहकाच्या ठेवी स्वीकारतात, ग्राहकाला कर्ज देतात त्याप्रमाणे मध्यवर्ती बँक सरकारला या सोयी पुरविते. देशातील चलनव्यवस्थेची संपूर्ण जबाबदारी मध्यवर्ती बँकेकडे आहे. देशातील बँक व्यवसायाचे नियमन करणे, पतपैशावर नियंत्रण ठेवणे व सरकारने आखलेल्या धोरणाची अंमलबजावणी करणे आदि कार्ये मध्यवर्ती बँक करते.

**स्वातंत्र्योत्तर काळ आणि वित्तीय सुधारणा :–**

15 ऑगस्ट, 1947 रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले. भारताची फाळणी झाल्यामुळे बँकाच्या आर्थिक स्थितीवर परिणाम झाला. स्वातंत्र्योत्तर काळातील महत्वाच्या घटना खालीलप्रमाणे सांगता येतील.

1. बँकिंग नियमन कायदा 1949 : देशातील बँकिंग कार्यात सूसूत्रता व समन्वय साधण्याकरिता.
2. रिझर्व्ह बँकेचे राष्ट्रीयीकरण : 1949 साली
3. स्टेट बँकेची स्थापना : 1 जुलै 1955 रोजी
4. बँकांचे एकत्रीकरण
5. व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण : 19 जुलै 1969 आणि 15 एप्रिल 1980 रोजी
6. अग्रणी बँका : 1969 साली
7. प्रादेशिक ग्रामीण बँकांची स्थापना : 1975 साली
8. सहकारी बँका : 1904 च्या सहकार कायद्याअंतर्गत
9. विकास बँका : भारतात साधारणपणे 1948 नंतर स्थापन

**मध्यवती बँकेचे कार्य:**

भारतातील रिझर्व्ह बँक ही सध्या मुख्यतः तीन प्रकारची कार्य करते.

1. देशातील बँका व वित्तसंस्था यांना ठेवीची सुरक्षितता व बँकांचे स्थैर्य जोपासण्याठी नियम घालून देणे व त्यांचे पालन करण्यासाठी नियमित अहवाल मागवणे.
2. चलनविषयक धोरण ठरविणे. उदा. बँकरेट, रेपोरेट, सी.आर.आर. इ. मध्ये परिस्थितीनुरूप बदल करणे.
3. शेतीला सहकारी यंत्रणेद्वारा नाबार्ड मार्फत पुरेसा पुर्नवित्तपुरवठा होत राहील असे पाहणे.

या तीनही कांमाकडे रिझर्व्ह बँकेला नीट लक्ष देता यावे, राजकीय हस्तक्षेप होऊ नये. आवश्यकतेनुसार कठोर निर्णय घेता यावेत यासाठी रिझर्व्ह बँकेची स्वायत्तता जपली जाणे अत्यंत आवश्यक आहे.

**अलीकडील काळात रिझर्व्ह बँकेचे बदलते स्वरूप :–**

भारत सरकारने अलीकडेच जुलै 2016 मध्ये इंडियन फायनान्शियल कोड नावाचे विधेयक प्रसृत केले असून या विधेयकातील मुख्य तरतूद अशी की मॉनेटरी पॉलिसी ठरविण्याचा अधिकार सध्या जो रिझर्व बँकेच्या गव्हर्नरला आहे तो काढून घेऊन मॉनेटरी पॉलिसी कमिटी ( MPC) ला दिला आईल. रिझर्व्ह बँकेचा सध्या गव्हर्नर प्रमुख आहे. त्याच्या डोक्यावर चेअरमन बसवला जाईल. ( MPC) वर गव्हर्नर च्या जोडीला बँकेच्या बोर्डाचे 2 व सरकारी अधिकारी 4 हे सभासद असतील. त्या समितीत बहुमताने



Scanned by CamScanner

निर्णय घेतला जाईल. यावरून स्पष्ट दिसते की सरकारला बँकेची स्वायत्तता संपवून सगळा अधिकार भारत सरकारच्या हातात केंद्रीत होईल. याकडे सर्वांनी डोळसपणे पाहणे गरजेचे आहे.

सध्या सर्वसमावेशक विकासावर बँकिंग क्षेत्राने काही निश्चित धोरणे आखून त्यावर अमंलबजावणीही केली आहे. जनधन योजना, पेमेण्ट बँका, लघुवित्त बँका, बंधन बँक ही त्याची उदाहरणे आहेत. ग्राहकांना स्पर्धेचे फायदे मिळावेत व ग्राहकांच्या विशिष्ट गरजा भागाव्यात अशी दोन्ही उद्दिष्टे यामागे आहेत.

डॉ. रघुराम राजन यांच्या नंतर जे नव नियुक्त गव्हर्नर डॉ. उर्जित पटेल यांना पुढील काळात अधिक धडपड करावी लागेल. वित्त मौद्रीक धोरण समितीच्या माध्यमातून पतधोरण जाहीर करून कामात एक लवचिकता आणावी लागेल, हे मात्र निश्चित आहे.

संदर्भसूची


1. के.पी. बैरागी ( 2014) : 'भारतीय बँक व्यवस्था' अथर्व प्रकाषन, पुणे.
2. ढगे,लोबो, फर्नांडीस ( 2014) : 'भारतीय बँक प्रणाली' के.एस. प्रकापन , पुणे.
3. त्रैमासिक ( जाने.– मार्च 2016) : 'समाज प्रबोधन पत्रिका'
4. मासिक ( सप्टेंबर 2016) : 'चाणक्य मंडल




Scanned by CamScanner